## नियमीत दिवाणी दावा क्र.०६/२०२१ मधील
## निशाणी क्र.१७ खालील आदेश

वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ व आदेश १ नियम १० प्रमाणे दाव्यामध्ये पक्षकार सामाविष्ट करुन त्यासंदर्भात दाव्यात दुरुस्ती करण्याची विनंती केली आहे.

०२. वादी अर्जात कथन करतात की, सदरचा दावा वाटप, जाहीर ठरावाकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल करण्यात आलेला आहे. वादी पुढे कथन करतात की, प्रतिवादी क्र.१ याने दावा मिळकतीमधील वादीचा हिस्सा व हक्क डावळण्याचे हेतुने सदरची मिळकत श्री.राजन रघुनाथ खोले यांना विना मोबदला बक्षीसपत्राने दिल्याचे समजले. तसेच, सदरचे विनामोबदला बक्षीसपत्र दि.०५/०४/२०२३ रोजी दस्त क्र.७१३/२०२३ अन्वये नोंदलेला आहे. अशा परिस्थितीत श्री.राजन रघुनाथ खोले हे दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे, त्यांना दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.२ म्हणून सामाविष्ट करुन घेण्याची व त्याअनुषंगाने वादकथनांमध्ये परिच्छेद ६(अ), तसेच दावा कलम ११ व दावा कलम १० ब नंतर १० ब १) सामाविष्ट करण्याची विनंती वादींतर्फे करण्यात आली.

०३. त्याउलट, प्रतिवादीने म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत नोंदविली आहे .

०४. उभयपक्षकारांच्या विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले असता, सदरचा दावा वाटप, जाहीर ठरावाकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल करण्यात आलेला आहे. दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.१ ने विनामोबदला बक्षीसपत्राने

श्री.राजन रघुनाथ खोले यांचे नावे केली आहे. त्यामुळे, दाव्यातील वादप्रश्नांचा प्रभावी व पुर्णपणे निपटारा करण्यासाठी त्यांच्या उपस्थितीची आवश्यकता असल्याचे निदर्शनास येत आहे.

०५. न्यायालयाला दाव्याच्या कोणत्याही स्थितीमध्ये आवश्यक पक्षकारांना वादी अथवा प्रतिवादी म्हणून सामाविष्ट करण्याचे अधिकार दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश १, नियम १०(२) अन्वये प्राप्त आहेत. सदर खटल्यातील परिस्थिती पाहता, दाव्यातील वादप्रश्नांचा निर्णय करण्यासाठी प्रस्तावित प्रतिवादी यांना दाव्यात पक्षकार म्हणून सामाविष्ट करणे आवश्यक असल्याचे दिसत आहे. तसेच, प्रतिवादीचे देखील कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, दाव्याचे अंतिम निराकरण होण्यासाठी न्यायाचे दृष्टीने अर्ज मंजुर होणे आवश्यक ठरते असे मला वाटते. त्यामुळे, प्रस्तावित दुरुस्ती मंजुर करणे उचित होणार आहे. म्हणून, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे:-

**:-आदेश-:**

| | |
|---|---|
| **०१.** | अर्ज (निशाणी क्र.१७) मंजुर करण्यात येतो. |
| **०२.** | वादींनी अर्जात सुचविलेली दुरुस्ती विनाविलंब दाव्यामध्ये करुन त्याअनुषंगाने दुरुस्त दाव्याच्या प्रती न्यायालयात सादर कराव्यात. |

( खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला )

सही/-

**पाली.** **(मीना वामन जाधव)**

**दिनांकः २१.१२.२०२३.** **दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पाली.**